# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ Board of Examinations and Evaluation**


जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 839
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 7 OCT 2020

## परिपत्रक/15

वाचा :- प्रस्तुत विद्यापीठ कार्यालयीन पत्र क्र. सोविसो/परीक्षा/२०१५-१६/६०२, दिनांक २१,जुलै,२०१५

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांना कळविणेत येते की, प्रस्तुत विद्यापीठाकडून वाचा येथे नमूद केलेल्या पत्राच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयात शिकत असलेले विद्यार्थी विद्यापीठाशी थेट संपर्क करीत असलेली बाब निदर्शनास आणून दिली होती. महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांने थेट विद्यापीठाशी संपर्क साधणे ही बाब नियमास धरुन नसून ब-याच प्रमाणात आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी वेगवेगळया कामासाठी विहित यथोचित मार्गाचा अवलंब करीत नसून थेट विद्यापीठाशी संपर्क करीत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अनावश्यक अशा स्वरुपाचा ताण विद्यापीठ प्रशासनावर पडत आहे.

त्यामुळे आपणास पुनश्य: एकदा सूचना देण्यात येत आहेत की, आपल्या महाविद्यालयातील कोणताही विद्यार्थी कोणत्याही कामासाठी थेट विद्यापीठाशी संपर्क साधणार नाही, याची आपण वैयक्तिकरित्या लक्ष घालून त्याबद्दलची दक्षता घ्यावी. विद्यार्थ्यांचा कोणताही अर्ज हा योग्यती कागदपत्रे सोबत जोडून आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्राय व शिफारसीसह विद्यापीठाकडे महाविद्यालयातील कर्मचा-यासोबत दाखल करण्यासाठी पाठवून दयावे. त्याचा पाठपुरावा देखील महाविद्यालयामार्फत करुन सदरील प्रकरण विद्यापीठाकडून पुर्ण करुन घेऊन महाविद्यालय स्तरावरच मार्गी लावण्याबाबतचे प्रयत्न करणे आपणावर बंधनकारक आहे, याची नोंद घ्यावी.

**(सी.ए श्रेणीक शहा)**
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,
प्राचार्य/संचालक, प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/संकुले,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर